द्वा. द्वः

प्रियंका जोशी

साहित्य प्रतिष्ठान®

पुस्तकाचे नांव सा. सू.

प्रकार : टाईम-पास

लेखिका : प्रियंका जोशी

joshipriyankaj@gmail.com

अंतर्गत सजावट : सुनिल सामंत

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

e Sahity Pratishthan
eleventh floor
eternity, G1102
eastern express highway
Thane. 400604
Ph : 9869674820

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012

esahity@gmail.com
www.esahity.com
www.ednyaneshwari.com
www.marathiriyasat.com

अर्पणपत्रिका

हे माझे पहिले वहिले पुस्तक

त्या माझ्या पहिल्या वहिल्या सा.सू.ला

भयपूर्वक अर्पण !

या कथेतील व्यक्ती, स्थळ, काळ, प्रसंग, माणसे, कुत्रा, रस्ता, घर, कॉलेज वगैरे वगैरे सर्व काही निव्वळ काल्पनिक असून त्यांचे कोणाही जिवंत वा मृत व्यक्ती, माणसे, कुत्रा किंवा ऐकीव प्रसंग किंवा शहर, रस्ता, घर, कॉलेज यांच्याशी साधर्म्य आढळून आल्यास तो निव्वळ आणि निव्वळ (आणि निव्वळच) योगायोग समजावा. या पुस्तकातून निव्वळ करमणूक व विनोदाची अपेक्षा असून कोणीही यातील कथा मनाला लावून घेऊन स्वतःला सुधारण्याच्या प्रयत्नाला लागू नये ही विनंती.

सा.सू. - भाग १

काही दिवसांपूर्वी पुण्याला काही कामानिमित्त चक्कर झाली. माझ्या कॉलेजच्या भागामधेच काम होतं, काम आटोपलं आणि सहज फेरफटका मारावा म्हणून मी चालत निघाले. कॉलेजच्या दिवसांपेक्षा थोडाफार बदल झालेला दिसत होता त्या भागामधे, त्या वेळच्या आठवणींमधे चालतानाच समोर एकदम 'ब्राउनी' दिसला आणि त्या पाठोपाठ काकूंचा मुलगा! हो तोच होता तो, थोडासा ढोला झालाय बहुतेक पण चेहरा सेमच आहे अजुन! मी लगेच नजर वळवली आणि रस्ता क्रॉस करून जायला लागले. ते दोघे पुढे निघून गेले पण, माझे विचार मात्र त्या घराकडे वळले जिथे मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा 'पेईंग गेस्ट' म्हणून राहायला गेले होते!

मला अगदी व्यवस्थित आठवते आमची पहिली भेट!

२९ जुलै चा तो दिवस होता. पुण्यामधे नेहमी असतो तसा भुरभुर पाऊस सुरू होता. दुपारचा १.३०वाजला होता. कॉलेजमधे फीस भरून मी, बाबा, नुकतीच भेटलेली माझ्याच कोर्सची मैत्रीण आणि तिचे बाबा असे चौघेजण तो पत्ता शोधत निघालो. घर लगेच सापडलं, अगदी पाचच मिनीटावर आहे म्हणून आम्ही सगळे एकदम खुश होतो. दुमजली घराचं छोटसं गेट उघडून आम्ही आत गेलो. पुणेकराचं घर म्हणून थोडी धाकधूक होती मनात पण गेटवर कुठेही पाटी दिसली नाही तसे आम्ही बिनधास्त झालो की आत कुत्रा नसणार. त्यातही दारातली रांगोळी बघून मला थोडं बरं वाटलं.

पुढे दारावर देखील कुठे पाटी नव्हती म्हणून आम्ही बेधडकपणे बेल वाजवली. आतून एकदम जोरात कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. आम्ही दोघी घाबरून थोडं मागे सरकलो. कोणी तरी कुत्र्याला थोडसं आवरलं आणि करडया आवाजात विचारलं,'कोण आहे?' मराठी असल्यामुळे मी पुढे होऊन सांगितलं, 'पेईंग गेस्ट साठी आलो आहे'.

मग एका माणसाने फक्त अर्धाच दरवाजा उघडला आणि बघितलं की बाहेर कोण आलं आहे. शहानिशा करून मगच त्यांनी आमच्यासाठी पूर्ण दरवाजा उघडला. आत गेल्यावर पहिलं दर्शन झालं, ब्राऊन कलरच्या एका कुत्र्याचं. तो अगदी रागात आमच्याकडे बघत होता आणि त्याला एका बाईने हाताने आवरलं होतं.

त्या बाईने आम्हांला एक-एक प्रश्न विचारायला सुरूवात केली. कोणत्या कॉलेजमधे ॲडमिशन घेतलं, कोणत्या गावचे आहात, आमच्या दोघींच्या वडिलांना कुठे काम करतात वगैरे विचारलं. आम्ही योग्य ती माहिती पुरवली आणि मग विचारलं की जागा कोणती आहे? त्यावर त्या म्हणाल्या की, आधी मी सगळे नियम सांगते त्यानंतर तुम्हाला जागा दाखवते, जर पटत असेल तर पुढचं बोलूया.

मला ह्या आधी कधीही घराबाहेर राहण्याचा अनुभव नव्हता त्यामुळे मी फक्त ऐकत होते. माझी मैत्रीण तर हिंदी भाषिक होती त्यामुळे ती आणि तिचे बाबा पार गोंधळून गेले होते, त्यावेळेस खरं तर आम्हांला गरज होती, त्यामुळे त्यांचं ऐकुन घेण्याशिवाय पर्याय नव्हता, म्हणून माझे बाबा म्हणाले "ठीक आहे, सांगा."

नियमावली सांगायला सुरूवात झाली.

१. महिन्याचं भाडं अमुक रुपये आहे, ह्यामधे कमी-जास्त काही होणार नाही, उगाच रिक्वेस्ट करू नका.

२. पहिल्या दोन दिवसात पूर्ण भाडं द्यावं लागेल.



३. इथे फक्त १० महिने राहू शकता, पुढे जर राहायचं असेल तर दुसरं शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर येऊन चौकशी करायची, जागा रिकामी असेल तरच मिळेल. *(बापरे! म्हणजे फर्स्ट इयर झाल्यावर काय सगळं सामान घेऊन घरी जायचं आणि परत घेऊन यायचं!)*

४. दिवाळीनंतरच्या ५ महिन्यांचं भाडं तुम्हांला सुरूवातीला द्यावं लागेल मगच राहायची परवानगी मिळेल. (अरे देवा! इतके पैसे तर आज आणलेच नाहीत आपण :-(*बाबा आता काय करायचं??*)

५. जेवण, सकाळचा नाश्ता, दूध ह्यापैकी काहिही किंवा सर्व काही हवे असल्यास वेगळे पैसे पडतील. *(चला म्हणजे खाण्याची तरी सोय इथे होऊ शकते.)*

६. खोलीतला दिवा,पंखा ह्या गोष्टी फक्त गरजेपुरत्या वापरायच्या कारण वीजबील वेगळ घेतलेलं नाही.

७. इस्त्री अजिबात वापरायची नाही.

८. गरम पाणी फक्त एक बादली दिले जाईल. *(फक्त एकच बादली???)*

९. गादी आणि पलंग दिलेला आहे, बेडशीट स्वत:च वापरावं लागेल. उशी मिळणार नाही कारण आमच्याकडे उशी वापरायची पध्दत नाही. *(शेवटचं वाक्य ऐकून तर मला इतकं हसू आलं पण वातावरणाचं गांभिर्य बघता मी ते दाबलं.)*

१०. कपाट फक्त एकच दिलेले आहे, दोघींनी मिळून त्यातील अर्धा-अर्धा भाग वापरायचा. *(हे भगवान! हा कसला नियम?? पैसे घेत आहात तर निदान कपाट तरी सेपरेट द्याना !!)*

११. रात्री ९ नंतर बाहेर जाण्याची परवानगी नाही.

१२. इथे असणाऱ्या फोनवर तुमच्या घरच्यांचा फोन आठवडयातून फक्त एकदा घेण्याची सोय आहे, वार तुम्ही ठरवू शकता. *(नशीब! मला वाटलं ह्याचे पण पैसे आकारणार की काय! ;-))*

हूss! हे नियम ऐकुन आम्हांला दोघींना तर टेन्शनच आलं आणि बाबा लोकांच्या कपाळावर घाम! पण आमच्यावर वेळ अशी आली होती की, अडला हरी अन. .म्हणून आम्ही चौघांनी सगळे नियम मान्य केले.

त्यानंतर आम्हांला खोली दाखवली गेली, खोली तशी मोठी होती, दोन बाजूला खिडक्या होत्या, तिथेच दोन कॉट्स टाकले होते आणि समोर एक गोदरेजचं दोन दरवाजे असलेलं कपाट होतं, त्याला वेगवेगळ्या किल्ल्या देखील होत्या. ते बघून मला जरा हायसं वाटलं.

खोली बघून आम्ही दोघींनी आपापल्या बाबांना 'चालेल' म्हणून सांगितलं. तसे माझे बाबा पुढे झाले आणि म्हणाले की, 'ह्या मुली आजपासून इथे राहू शकतील का?' लगेच काकू म्हणाल्या, 'पूर्ण महिन्याचं भाडं द्या आणि सामान लगेच आणा, काहीच हरकत नाही!'

आम्ही एकमेकांकडे बघायला लागलो, फक्त ३ दिवसांकरता पूर्ण महिन्याचं भाडं?? काय हे पुणेकर रे देवा! मी तर बाबांना म्हणाले की राहू देत मी मामाकडे राहीन आणि १ तारखेला इकडे शिफ्ट होईन. माझ्या मैत्रीणीने पण असंच ठरवलं.

१ तारखेला येतो म्हणून निघायला लागलो तसं काकूंनी सांगितलं की, 'ऑगस्ट महिन्याचे पूर्ण पैसे द्यावे

लागतील तरच जागा राहील नाहीतर ३ दिवसात कोणा दुसऱ्याला दिली जाऊ शकते! मला तर इतका राग आला ना, ह्या लोकांना काही माणुसकी आहे की नाही, सगळ्या गोष्टी फक्त व्यवहार म्हणूनच बघायच्या आणि प्रत्येक गोष्ट पैशातच मोजायची!! आमचे हात दगडाखाली अडकले होते त्यामुळे पैसे द्यावेच लागले!

आम्हां दोघींचे बाबालोक राहायला चांगली जागा मिळाली ह्या निश्चिंतीत परतीच्या प्रवासाला निघाले.

इथे जेवायची वेळ दुपारी १ पर्यंतचीच आहे, त्यानंतर मी झोपते. तू आज पहिल्यांदा आली आहेस म्हणून जेवायला वाढते पण उद्यापासून हे चालणार नाही

सा.सू. - भाग २

१ तारीख उजाडली आणि मी, माझी मैत्रीण सामान घेऊन सकाळी ७ वाजताच घरी हजर झालो. थोडं भितभितच आत गेलो कारण तो कुत्रा पुन्हा ओरडण्याची भिती होती. काकूंनी आमचं स्वागत केलं आणि खोलीत सामान ठेवायला सांगितलं. मी त्यांच्याशी दुपारच्या जेवणाबद्द्ल बोलले आणि आम्ही कॉलेजला निघून गेलो. मी दुपारी १.३० वाजता घरी आले जेवायला तर दार बंद दिसलं, मी बेल वाजवली तसं काकांनी दार उघडलं आणि काकू पलंगावर झोपलेल्या दिसल्या!

मला वाटलं बरं नाही की काय, तसं विचारलं तर त्या म्हणाल्या की (१)जेवायची वेळ दुपारी १ पर्यंतचीच आहे, त्यानंतर मी झोपते. तू आज पहिल्यांदा आली आहेस म्हणून जेवायला वाढते पण उद्यापासून हे चालणार नाही.

मला हे ऐकून आईची अगदी मनातून खुप खूप आठवण झाली. ती बिचारी आम्ही म्हणू तेंव्हा जेवायला वाढायची. पण आता मी घराबाहेर पडले होते ना, इथे आई नव्हती हवे तसे लाड करायला. काकूंची हाक आली तशी मी माझ्या विचारांमधून जागी झाले आणि निमूटपणे जेवायला आत गेले.

पहिला घास खाल्ला आणि खुप बरं वाटलं, जेवण खुप चवदार होतं. आईच्या हातची सर नसली तरी अगदीच सुमार चव नव्हती. मी पटापट जेवले आणि बाहेर पडणार तेवढयात काकू म्हणाल्या की, '(२) तू ४ वाजेपर्यंत घरी येउ नकोस आणि तुझ्या मैत्रिणीला सुध्दा सांग. मी दुपारी १-४ ह्या वेळेत झोपते आणि (३) मला कोणीही डिस्टर्ब केलेलं खपत नाही!'

मी 'हो' म्हणून घराबाहेर पडले. लगेच कॉलेजमधे माझ्या मैत्रिणीला शोधून हा अतिमहत्त्वाचा निरोप दिला आणि लायब्ररीकडे पळ काढला.

लायब्ररीमधे जाऊन मी डोकं धरून विचार करत होते की रोज दुपारी १-४ ह्या वेळेत करायचं तरी काय?? अभ्यास करायचा म्हटलं तर ठीक आहे पण कधी जर काही अडचण आली, कधी झोपायची इच्छा झाली तर शेवटचं लेक्चर बंक करून घरी जाऊन जेवण करून घ्यावं लागेल नाहीतर उपाशीच ४ वाजेपर्यंत घराबाहेर बसावं लागेल!

नवीन कॉलेज, नवीन जागा ह्या सगळ्या गोष्टींचं नवल काही राहीलचं नाही, घराबाहेर पडले आणि चटके बसायला सुरूवात झाली. श्याss मी कधीच विचार केला नव्हता असं असेल घराबाहेर पडल्यावरचं लाईफ म्हणून!! जाउ देत आता काही करू शकत नाही. आलिया भोगासी असावे सादर!!

संध्याकाळी मी घरी पोहोचले तेंव्हा काकूंनी घरातल्या बाकी लोकांची ओळख करून दिली. घरात काका-काकू, त्यांचा मुलगा आणि ब्राउनी म्हणजे तो तिखट कुत्रा असं चौकोनी कुटुंब होतं आणि आता आम्ही दोघीपण त्यात ॲड झालो होतो. मला त्या कुत्र्याचं नाव खुप आवडलं, तो गावठी होता पण एकदम शार्प होता. तो जरी बाकी सर्वांसाठी फक्त पाळीव प्राणी असला तरी काकूंचा मात्र जीव की प्राण होता. स्वत:च्या मुलापेक्षा जास्त त्या ब्राउनीचच कौतुक करत होत्या ;-)



ओळखीचा समारंभ संपला तसं आम्ही जेवायला बसलो.काकूंनी लगेच सांगितलं की (४) रोज ८.३० ला जेवायला हजर राहायचं, उशीर चालणार नाही. आम्ही 'हो' म्हणालो आणि जेवायला बसलो. जेवणं आटोपली आणि माझ्या बाबांचा फोन आला, शिफ्टींगची चौकशी करून बाबांनी फोन ठेवला आणि काकू म्हणाल्या, 'तुझा फोनचा वार ठरला आता!' मी 'बरं' म्हणाले आणि आत निघून गेले.

सकाळपासून खुप दगदग झाली होती त्यामुळे आम्ही दोघी लवकर झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी काकूंनी ६ वाजताच दार वाजवलं, मी कशीबशी उठले आणि दार उघडलं, काकूंनी गर्जना केली, उठुन दोघीपण आवरून घ्या कारण (५) माझ्या मुलाला पुन्हा त्याच्या वेळेला कोणी डिस्टर्ब केलेलं आवडत नाही! मी 'ठीके' म्हणाले आणि माझ्या मैत्रिणीच्या बेडवर जाऊन कोसळले. पुन्हा काकूंनी हाक मारली की, गरम पाणी काढून ठेवलं आहे,माझ्या डोळ्यासमोर एकदम लख्ख प्रकाश पडला आणि नियम क्र.७ आठवलं. त्यानंतर आम्ही दोघींनी पटापट आवरलं आणि घरातून पळ काढला.

१ ला आठवडा असाच सगळ्या सुचना आणि नियम समजावून घेण्यात गेला.रविवारचा दिवस जवळ आला :-) रात्री झोपतानाच मी देवाला प्रार्थना केली,

'देवा, प्लीज उद्या तरी काकूंनी ६ वाजता नको उठवायला!' आणि आमचं नशीब थोडंस चांगलं निघालं. काकूंनी आम्हांला ६ ऐवजी ७.३० ला उठवलं आणि नेहमीची गर्जना केली, आवरून घ्या!

मग मी उठले, आता रविवारचा दिवस म्हणजे आठवडयाचे कपडे धुणे कार्यक्रम असणारच ना म्हणून मी २,४ कपडे घेऊन जात होते आणि काकू म्हणाल्या, '(६) रविवारी दुपारी जेवण झाल्यावर कपडे धुवायचे!' मी त्याच पावली परत रूममधे गेले आणि कपडे दिले फेकुन! बेडवर फतकल मांडलं तशी माझी रूमी म्हणाली, 'क्या हुआ?' मी काय डोंबल सांगणार तिला, मला तर त्या क्षणी तिथून पळून जायची इच्छा झाली होती. काय हे (सा)रख्या (सू)चना, (सा)रख्या (सू)चना! आणि मी त्या सगळया ऐकतीये हेही एक नवल! माझा संडेचा सगळा मूडच गेला होता!

ह्या सगळया सूचनांच्या राज्यात एक महिना कसाबसा पार पडला. लकीली कॉलेजमधे सगळं सुरळीत होतं त्यामुळे मी दुपारी तरी बिझी झाले. काही दिवसांतच आमची परिक्षा आली. रोज रात्री आम्ही दोघी १२-१ वाजेपर्यंत अभ्यास करत होतो. परिक्षा पार पडली आणि त्याच दिवशी संध्याकाळी काकूंनी आम्हांला दोघींना सांगितलं की, रात्री उशीरापर्यंत जागून अभ्यास करण्यापेक्षा दिवसा सगळा अभ्यास करून ठेवत जा. मला आधी काही कळालंच नाही त्या असं का म्हणत आहे ते. माझी रूमी म्हणाली की, 'मुझे रातको पढनेकी ही आदत है तो, थोडी देर तो मै पढूंगी.' काकू एकदम रागावल्याच,

म्हणाल्या 'आदत-वादत कुछ नही होता, यहां रेहना है तो मेरा सुनना ही पडेगा!' मग आम्ही काय बोलणार, मुकाटयाने आत निघून गेलो!

थोडया वेळाने माझ्या डोक्यात प्रकाश पडला आणि नियम क्र.५ आठवला, अच्छा तर वीजबील वाढेल म्हणून आम्ही रात्री अभ्यास नाही करायचा का! मग मी ठरवलं की पुढच्या वेळेस ह्यांचा लाईटच नाही वापरायचा अभ्यास करायला, मग बघू काय म्हणतात ते!

सा.सू. - भाग ३

"तुला काही कळतं की नाही, असं घरामधून ओरडून बोलत असतात का? बाहेर जाऊन बोलायला काय झालं होतं??"

एकदा मी आणि रूमी असच गप्पा मारत बसलो होतो आणि मधेच एक विनोद झाला तशा आम्ही दोघी जोरजोरात हसायला लागलो, काही सेकंदातच काकू आत धावत आल्या आणि म्हणाल्या, 'अगं, किती जोरात हसताय तुम्ही,काही वाटतं का तुम्हांला? (७)आमच्या घरात इतक्या जोरात हसण्याची परवानगी नाहीये!' घ्या! काय बोलणार ह्यावर??!! आम्ही लगेच आमची तोंडं शिवली आणि डोकी पुस्तकात घालून काहितरी वाचत बसलो!

एकदा माझ्या कॉलेजचा ग्रुप आमच्या घरासमोरून पास होत होता, मी रूममधेच काहितरी आवरत बसले होते. तितक्यात कोणीतरी बाहेरून हाक मारली, मी बघितलं आणि खिडकीतून गप्पा मारायला सुरूवात केली. पाच-एक मिनीटं आम्ही बोललो आणि ते लोकं पुढे निघून गेले.

मी मागे वळले तर समोर काकू! मी त्यांना विचारलं, 'काय झालं, काही काम होता का?' तशा त्या जवळपास ओरडल्याच, "तुला काही कळतं की नाही, असं घरामधून ओरडून बोलत असतात का? बाहेर जाऊन बोलायला काय झालं होतं??" मी फक्त 'सॉरी' म्हणाले आणि घराबाहेर निघून गेले!

त्यानंतरही बरेच असे प्रसंग आले की जिथे नॉर्मल माणूस कधी साधं त्या प्रसंगावर बोलणार पण नाही पण आमच्या काकू त्यावरही वाद घालायच्या! त्यामुळे आम्ही दोघीही काकूंपासून थोडंसं लांबच राहायला लागलो, त्या कधी, कोणत्या कारणाने चिडतील हे सांगताच यायचं नाही.

पण कधी-कधी आमचं नशीब अगदी जोरावर असायचं आणि आम्हांला काकूंच्या पाकसिद्धीतुन अगदी चवदार पदार्थ खायला मिळायचे. असंच, गणपतीच्या वेळेला काकूंनी आम्हांला उकडीचे मोदक खाऊ घातले होते, इतका स्वादीष्ट पदार्थ मी आजपर्यंत माझ्या आईच्या हातचा पण खाल्ला नव्हता. पण, खरंच चवदार स्वयंपाक हा काकूंचा बेस्ट पॉईंट होता आणि कदाचित त्यामुळेच आम्हांला त्या कितीही बोलल्या तरी ते पचवायची शक्ती मिळत होती ;-)

अशातच हिवाळा सुरू झाला. काकूंना स्वच्छतेचं फार वेड, कामवाली बाई काम करून गेली तरी त्या पुन्हा एकदा सगळं घर स्वच्छ करायच्या. मला तर खुप हसू यायचं, पण, काकूंसमोर हसण्याची काय, स्मितहास्य करण्याची सुद्धा हिंमत नव्हती माझी! आणि अशातच एक दिवस कामवाली बाई ८ दिवस येणार नसल्याच कळालं. आतापर्यंत काकूंनी कधीही जी सूचना दिली नव्हती म्हणजे आम्ही जी एक्सपेक्ट केली नव्हती ती आमच्यासमोर आली. काकूंनी फर्मान काढलं की,(८) रोज तुम्ही दोघींनी खोली स्वच्छ करूनच कॉलेजला जायच! नोss वे! काकू काय बोलत होत्या हे?? त्यांना त्या बाईने केलेलं काम पटत नव्हतं तर आम्ही केलेलं पटलं असतं का? जे काही असेल, आम्हांला त्या सूचनेची सॉरी हुकमाची अंमलबजावणी करावीच लागणार होती. मग काय, आम्ही दोघींनी आलटून-पालटून कामं करायचं ठरवली, एका दिवशी तिने झाडून घ्यायचं आणि मी लादी पुसायची आणि दुसऱ्या दिवशी मी झाडून घ्यायचं आणि तिने लादी पुसायची. असं करत करत आम्ही ८ दिवस पार पाडले आणि विशेष म्हणजे काकूंनी एकदाही कंप्लेंट केली नाही :-) :-) :-)

म्हणजे आम्ही दोघी पुढे जाऊन काही नोकरी जरी करू शकलो नाही तरी हे काम अगदी व्यवस्थित करू ह्याची खात्री पटली ;-)

इथे आल्यापासून आम्ही एका एका दिव्यातून जात होतो पण, आई-बाबा मात्र टेन्शन फ्री होते की, आपली मुलगी एका चांगल्या घरातल्या लोकांसोबत राहतीये, तिची अगदी सगळी व्यवस्था चांगली लागलीये वगैरे! पण म्हणतात ना, ज्याचा जळतं त्यालाच कळतं!

तर असे हसत-खेळत(?) दिवस चालले होते आणि एक दिवस माझ्या रूमीला काय दुर्बुद्धी झाली काय माहित, रविवारच्या सकाळी तिने बाथरूममधून यायला थोडासा उशीर केला.काकूंच्या तीक्ष्ण नजरेतून तीची ही कृती सुटली नाही आणि महत्त्वाच्या एका सूचनेचं उल्लंघन केल्याबद्दल काकूंनी आम्हांला चक्क शिक्षा सुनवली!! माझ्या रूमीने सकाळी कपडे धुतले होते आणि काकूंना ते कळालं होतं त्यामुळे आम्हांला दोघींना पुढच्या (९)रविवारपासून बाहेरच्या हौदावर फक्त सकाळीच कपडे धुण्याची शिक्षा ठोठावली गेली होती :'-(बाहेरच्या हौदावर कपडे धुवायचे आणि तेही सकाळच्या थंडीमधे??!! ह्या विचारानेच मला हुडहुडी भरली होती पण, पर्याय नव्हता. काकूंनी आकाशवाणी केली होती आणि तिचं पालन करणं आम्हा दोघींना

क्रमप्राप्त होतं!! मला त्या क्षणी स्वत:ची सगळ्यात जास्त कीव आली, आयुष्यात अगदी पहिल्यांदाच!!

रविवारची सकाळ इतकी छान सुरू झाल्यावर जेवणाची इच्छा दोघींना पण उरली नव्हती पण पुन्हा काकूंचे बोलणे खाण्यापेक्षा आम्ही जेवण घेणं पसंत केलं.

दुपारी मी आवरून घेतलं आणि रूममधे आले तर माझी रूमी गुढघ्यात डोकं खुपसून बसली होती, मला कळालचं नाही ती अशी का बसली आहे ते, जवळ जाऊन बघितलं तर ती एकदम मला बिलगली आणि तोंड दाबून रडायलाच लागली.मला काहीच समजेना की हिला एकाएकी रडायला काय झालं! बरं असं माझ्यासमोर कोणीतरी पहिल्यांदाच रडत होतं त्यामुळे तिला कसं सावरावं हेही मला सुचेना. ह्या विचारांमधे १-२मिनीटे गेली आणि तिचा पूर थोडा ओसरला. मग, मीहि भानावर आले अन तिला विचारलं, 'क्या हुआ?? रो क्यों रही है तू?? तबियत ठीक नहीं है क्या?? या पापा की याद आ रही है??' तसं ती म्हणाली, 'नहीं रे, आय ॲम सॉरी. आज मेरी वजह से तुझे भी सजा मिली, मै सुभा कैसे भूल गयी पता नहीं, आय ॲलम रियली सॉरी!'

हुश्श! हे कारण होतं होय, मी कसली घाबरले होते! मी तिच्या डोक्यात टपली मारली आणि म्हणाले, 'डोन्ट वरी यार, हम दोनो एक टीम है, खुशी और गम दोनो मिलबाटकर मनायेंगे, नेक्स्ट संडे तू सिर्फ मजा देख. और अब टेन्शन मत ले आज का संडे अभी बाकी है, चल घुमने चलते है'. ती मस्त हसली, मला पण हलकं वाटलं आणि आम्ही घराबाहेर पडलो.

आठवडा अगदी शांततेत पार पडला, कदाचित ह्या वीकचा सूचनांचा / नियमांचा आणि शिक्षेचाही कोटा फुल होता म्हणूनच.

रविवार उगवला, मी मुद्दामच सक्काळी ६ वाजते उठले, धाडधाड आवाज करत आवरलं. रूमीपण लगेच उठली आणि आमच्या 'मिशन कपडे धुणे @ हौद' साठी तयार झाली. आम्ही दाराबाहेर आलो सगळं सामान घेऊन आणि थंडीची एक लहर अगदी पूर्ण अंगातून पास झाली, एक क्षण दोघीपण शहारलो पण, पुन्हा निश्चय केला आणि हौदावर पोहोचलो. मी लगेच मोठमोठयाने गाणे म्हणायला सुरूवात केली आणि रूमी ने कपडे आपटायला. फूल-टू धिंगाणा करत आम्ही तासभर अगदी व्यवस्थित कपडे धुतले. आजूबाजूला राहणारी सगळी जनता एकदा तरी डोकावून गेली आमचं काय सुरू आहे हे बघण्याकरता. आमच्या घरातले तर सगळे जागे झालेच होते पण, वरती राहणारी बि-हाडं सुद्धा बॅल्कनीत येऊन आमचा टाइमपास एंन्जॉय करत होती.

सगळं झाल्यावर आम्ही विजयी मुद्रेने घरात प्रवेश केला आणि समोरच लालबुंद झालेल्या काकूंना बघून थबकलो.पण, लगेच लक्षात आलं की आज तर आपण त्यांनी दिलेल्या सुचनेचं तंतोतंत पालन केलं आहे मग का घाबरायचं, उलट, आम्ही छाती बाहेर काढून त्यांच्यासमोरून आत गेलो :-) :-)

आत जाऊन दोघी अगदी पोट धरून हसायला लागलो पण सायलेन्ट मोड मधे ;-)

त्या दिवशी आम्ही दोघी एकदम खुश होतो आणि काकू हुप्प ;-)

सा.सू. - भाग ४

संध्याकाळी मी आणि रूमी भटकून आलो आणि दारातच थबकलो! दोघीपण समोर घडत असलेलं दृश्य आ वासून बघत आत आलो. काका चक्क काकूंशी भांडत होते, काकूसमोर उभे राहून हातवारे करत मोठ्ठया आवाजात ओरडत होते!! आजपर्यंत मी काकांना साधं मान वर करून बोलतांना बघितलं नव्हतं आणि आज अचानक त्यांनी जमदग्नीचा अवतार धारण केला होता!! विषय होता आज सकाळी झालेल्या तमाशाचा. काका आमची बाजू घेऊन काकूंशी भांडत होते की, 'दुसऱ्याच्या घरच्या पोरी आपल्या इथे पैसे देऊन राहतायेत म्हणून तू वाट्टेल ते करायला नको लाउस त्यांना. स्वत:च्या पोराला म्हटलं तर वळण नाहीये आणि परक्यांना शिक्षा देतीये. मी आतापर्यंत काहीच बोललो नाही पण हे असले प्रकार मला खपणार नाही!!! पुढच्या रविवारी असला तमाशा नकोय मला!!'

बाsपरे, काका आमच्याविषयी इतका चांगला विचार करतात?? मला तर मनामधे आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. पण काकूंची अवस्था पार वाईट झाली होती, त्या आता रडतील की उठून काकांना मारतील काहीच अंदाज येत नव्हता. जे काही असेल, जे घडत होतं ते आमच्यासाठी खुप चांगलं होत होतं, मी मनातून काकांना अगदी साष्टांग नमस्कार घातला. पुढच्या रविवारची शिक्षा रद्द केल्याबद्दल.

काका थोडे शांत झाले आणि आमच्याकडे वळून म्हणाले की, 'रविवारची शिक्षा रद्द झाली आहे पण, कपडे धुण्यासाठीचा जो नियम आहे तो तसाच राहील.' आणि बाहेर निघून गेले.

मला एक क्षण कळलंच नाही ते काय बोलले ते. सुन्न डोक्याने मी आत गेले. २ मिनीटानंतर नॉर्मल झाल्यावर डोक्यात आलं की काकू तर काकू पण काकासुद्धा काही कमी नाहीत. काय त्रास आहे यार, कुठुन बुद्धी झाली आणि इथे राहायला आलो. काकूंनी पार अडकवून टाकलंय ५ महिन्याचे पैसे घेऊन. आत्ता कुठे दिवाळी जवळ आलीये, हे वर्ष कसंही करून ह्याच जेलमधे काढावं लागणार आहे. उगाच विचार करून डोकं फोडण्यात अर्थ नाही, जाऊ देत!

मला वाटलं काकू आज जेवायला देणार नाहीत पण, लकीली तसं काही झालं नाही. जेवणं स्मशान शांततेत पार पडले आणि तो मोस्ट हॅपनिंग डे फायनली संपला.

पुढे काही दिवसात हाफ इयरली एक्झाम आली. आणि पुन्हा माझ्या डोक्यात किडा वळवळला.रात्री अभ्यास तर करायचा होता पण काकूंचा लाईट पण वापरायचा नव्हता. मग मी ओम सुपर मार्केट मधून एक डझन मेणबत्त्या आणल्या आणि रात्री बरोब्बर ११वाजता लाईट बंद केला आणि मेणबत्त्या लावल्या. आम्ही दोघींनी अभ्यास सुरू केला. खरं तर इतकं हसू येत होतं पण अभ्यासावर लक्ष द्यायचं होतं आणि हसलो असतो तर बाहेर आवाज गेला असता आणि आमच्यावर तोफ डागली गेली असती.

दुसऱ्या दिवशी आम्ही आठवणीने मेणबत्तीचा सगळा कचरा व्यवस्थित साफ केला आणि परिक्षेला

गेलो. दोन दिवस आमचा हा सगळा उद्योग कोणालाही खबर न-लागता सुरू होता पण तिसऱ्या दिवशी सकाळी खुप घाई झाली आणि पेपर झाल्यावर माझ्या लक्षात आलं की मी सकाळी मेणबत्तीचा पसारा आवरालाच नाही! ओह नोss आता काही खरं नाही, काकू आज चांगलीच खरडपट्टी काढतील. इतके दिवस जे सांभाळून घेतलं ते सगळे प्रयत्न माझ्या एका क्षुल्लक चुकीमुळे पाण्यात जाणार.

शिट यार, हाउ कॅन आय फरगेट इट यारर.

क्लासमेट्स भेटले, पण रूमी कुठे दिसेना, सगळे जण पेपर कसा गेला वगैरे बोलत होते पण माझं कशात लक्षच लागत नव्हतं, कॉलेजच्या एक्झामपेक्षा मोठया परिक्षेतून मला घरी गेल्यावर जायचं होतं. माझं तर धाबच दणाणलं होतं.

भितभितच मी घरी गेले. लकीली रूमी पण माझ्या मागेच आली. मी तिला आत गेल्यावर सांगणार होते पण काकूंनी दारातच आम्हांला पकडलं. आणि काकूंच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला!

'रूममधे मेणबत्त्यांचा कसला कचरा करून ठेवलाय तुम्ही? मेणबत्त्या कशाला वापरल्या तुम्ही? रात्री लाईट कधी जात नाहीत आपल्याकडे, मग काय करत होतात तुम्ही मेणबत्तीचं??' मी मनात म्हटलं, *प्लॅनचेट करत होतो* असं सांगावं. पण तो विचार मी

लगेच झटकून टाकला आणि खरं-खरं सांगून टाकलं की, 'तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही रात्री लाईट फक्त कामापुरता वापरला आणि ११ नंतर मेणबत्तीच्या प्रकाशात अभ्यास केला. तुमचं वीजबील जास्त नको यायला ह्याची काळजी आम्हीच घ्यायला हवी ना!' मला वाटलं आता काकू काहितरी बडबड करतील. पण काकू काहीच बोलल्या नाही. फक्त पाय आपटत आत निघून गेल्या!! मी आणि रूमी एकमेकींकडे बघायला लागलो की हे जे घडलं ते खरं होतं? काकू आम्हांला एका शब्दाने देखील बोलल्या नाही? ग्रेट! १,२ मिनीटे थांबून आम्ही जणू वाट बघितली त्या बाहेर येऊन भांडण कंटिन्यू करण्याची पण त्या खरंच आल्या नाही तशा आम्ही दोघी आत गेलो आणि लगेच स्वच्छतेच्या कामाला लागलो. थोडया वेळाने काकूंनी जेवायला हाक मारली,जेवण करून आम्ही बाहेर पडलो.

त्या दिवसापासून एक गोष्ट मात्र घडली की काकूंनी आमच्याशी जेवढयास तेवढंच बोलायला सुरूवात केली, म्हणजे फक्त जेवायला त्या हाक मारू लागल्या. सुरूवातीला चांगलं वाटलं की चला घरात शांतता नांदतीये पण, एक-दोन दिवसांतच भिती वाटायली लागली की ही शांतता वादळापूर्वीची तर नसेल!

पण ह्यावेळेस आमचं लक खरंच चांगलं होतं, कुठलंही वादळ न-झेलता आम्ही अगदी हसतमुखाने दिवाळीच्या सुट्टीसाठी घरी गेलो :-)

सा.सू. - भाग ५

'अगं, प्रद्दुम्नला नवीन जॉब मिळाला आहे आणि तो बाहेरगावी जाणार आहे म्हणून त्याची सगळी तयारी करून देतीये. पहिल्यांदाच तो माझ्यापासून दूर जाणार आहे अगं, मला तर इतकी काळजी वाटतीये ना!'

सुट्टीनंतर खरं तर कॉलेजला परत येण्याची उत्सुकता खुप जास्त होती पण, पुन्हा काकूंकडेच राहावा लागणार ह्या विचाराने उत्साह सगळा मावळला. पण पर्याय नव्हता. सो वी बोथ केम बॅक टू द जेल.

घरी आलो तसं अगदी वेगळंच चित्र दिसलं, घरात कसली तरी तयारी सुरू होती. मी भितभितच (हो, दिवाळीची सुट्टी झाली म्हणून काकूंचा राग शांत झाला असेल असा गैरसमज मला करून घ्यायचा नव्हता.) काकूंना विचारलं की तयारी कसली सुरू आहे? तशा त्या अगदी हसून(?? काकूंना हसता सुद्धा येतं? :-)) म्हणाल्या की, 'अगं, प्रद्दुम्न (बायदवे, हे काकूंच्या मुलाचं नाव) ला नवीन जॉब मिळाला आहे आणि तो बाहेरगावी जाणार आहे म्हणून त्याची सगळी तयारी करून देतीये. पहिल्यांदाच तो माझ्यापासून दूर जाणार आहे अगं, मला तर इतकी काळजी वाटतीये ना!'.

मी वरकरणी थोडंसं स्मित करत म्हटलं,'काळजी वाटणं साहजिक आहे पण, तुम्ही टेन्शन घेउ नका, तो जिथे जातोय तिथे आपल्यासारखं एखादं घर बघून पेईंग गेस्ट म्हणून राहायचं म्हणजे काहीच प्रॉब्लेम नाही येणार!' आणि मनात म्हटलं

'काकू काळजी कशाला करताय, तो तर सुटला तुमच्या तावडीतून, अगदी उडया मारीत जाईल तो, आमचंच नशीब ग्रेट आहे जे अजुन ५ महिने इथे काढावे लागणार आहेत!'

घरी ही लगीनघाई सुरू होती आणि आमच्या कॉलेजमधे गॅदरिंगचे वारे वाहू लागले. काकू बिझी असल्यामुळे आम्ही बिनधास्तपणे गॅदरिंगच्या तयारीला लागलो. कॉलेजमधे फुल मस्ती करून घरी येऊन अगदी सुखात झोपू लागलो.

फायनली प्रद्दुम्नच्या जाण्याचा दिवस उगवला. आम्हांला सगळयांना बाय करून तो निघून गेला आणि काकू इकडे जोरजोरात रडायला लागल्या, अगदी लहान मुलासारख्या. मी आणि रूमी चाटच पडलो. हे काय होतंय? काकू रडत आहेत? आमच्यासाठी नवीनच शोध होता तो! आता आपण काही करायचं असतं का असं आम्ही एकमेकींकडे बघितलं आणि आत निघून गेलो. थोडया वेळाने काकू शांत झाल्या. तो दिवस पूर्ण त्या गप्पच होत्या. जेंव्हा रात्री त्यांच्या मुलाचा फोन आला तेंव्हाच त्यांची कळी खुलली आणि त्या नॉर्मल झाल्या :-)

मी, माझ्या दोन मोठया बहिणी आम्ही सगळयाजणी शिक्षणानिमित्त घराबाहेर पडलो होतो, आईला मी नेहमी भरलेल्या डोळयाने निरोप देतांना बघितलं होतं पण, आम्ही घराबाहेर पडल्यावर तिची काय अवस्था होत असेल ह्याची कल्पना आज मला काकूंना बघून आली, खरंच आईचा जीव तिच्या पिलांमधेच असतो.

आमच्या गॅदरिंगचा दिवस जवळ आला, आम्हां सगळ्या मुलींना साडी घालायची होती. आम्हां दोघींकडे पण साडया नव्हत्या. मग आम्ही काकूंना रिक्वेस्ट केली, त्या अगदी आनंदून गेल्या,त्यांनी सगळा खजिनाच आमच्या समोर खुला केला :-) मला तर कोणती साडी घालावी काही कळत नव्हतं. मग काकूंनीच मला एक साडी सिलेक्ट करून दिली आणि बाकी सगळ्या गोष्टी अगदी आमच्या मापाच्या वगैरे पण करून दिल्या. त्या इतक्या खुश दिसत होत्या ना, अगदी स्वत:च्या मुलींना तयार केल्यासारखं त्यांनी आम्हांला तयार करून दिलं. दागिने पण घालायला दिले. पण आम्ही दोघींनी उगाच रिस्क नको म्हणून तो आग्रह टाळला. घरून अगदी पहिल्यांदाच आम्ही इतक्या खुश होऊन बाहेर पडत होतो :-) पण. . .

'सुरूवातीलाच सांगितलं होतं, उशीर झालेला चालणार नाही, तसं असल्यास बाहेर व्यवस्था लाऊन घ्यायची, विसरलात का??

तो दिवस खूप म्हणजे खूप धावपळीचा निघाला, सगळे कामं करत, साडी सांभाळून धिंगाणा करत अगदी दमून-थकून आम्ही दोघी रात्री ११ वाजता घरी आलो. दिवसभराच्या गोंधळात आम्ही सपशेल विसरलो होतो की घरी जायची डेडलाइन क्रॉस होतीये. बरं, हे तरी लक्षात यावं ना की उशीर होणार हे काकूंना कळवावं. पण त्या दिवशी आमचे ग्रह फिरलेच होते. त्यामुळे आता काय होणार हा विचार करतच आम्ही दार वाजवलं. पहिल्यांदा कोणीच दार नाही उघडलं. आम्ही पुन्हा नॉक केलं, काकूंना हाक मारली पण नो

रिप्लाय! आता थोडं टेन्शन यायला लागलं. एकतर दिवसभर काही धड खाल्लं नव्हतं त्यामुळे सडकून भूक लागली होती. त्यातच साडी घातलेली. त्यामुळे पण इरीटेट होत होतं,.बरं तेंव्हा दोघींकडे मोबाईल पण नव्हते, कोणा दुसऱ्या मैत्रीणिला विचारून तिच्याकडे जावं म्हटलं तर. आता काय करायचं? पुन्हा एकदा हिय्या केला आणि जोरात दार वाजवलं. मग लगेच दार उघडल्या गेलं, आत गेलो तर काकू झोपेची तयारी करून बसल्या होत्या. मला तर त्यांच्याकडे बघायचीपण भिती वाटत होती. पण, काय करणार चूक आमची होती. त्यामुळे आता घाबरून उपयोग नव्हता. मग काय मी सॉरी म्हणायला सुरूवात करणार इतक्यात काकूंनी बऱ्याच दिवसांपासून दाबून ठेवलेला राग बाहेर काढला, एक एक वाकबाण आम्हांला घायाळ करत होते.

- 'उशीर का झाला?'

मी - 'सॉरी काकू, आज गॅदरिंग होतं त्यामुळे लक्षातच नाही राहिलं की उशीर होइल म्हणून'

- 'मग, घरी यायचं बरं लक्षात राहिलं!'

मी - '. . .' फक्त मान खाली!

- 'सुरूवातीलाच सांगितलं होतं, उशीर झालेला चालणार नाही, तसं असल्यास बाहेर व्यवस्था लाऊन घ्यायची, विसरलात का??'-काकू ओरडल्या!

आम्ही ह्यावर काय बोलणार. .

- 'पुढच्या वेळेस दार अजिबात उघडलं जाणार नाही,लक्षात ठेवा! आणि हो, त्या साडया धूवून, नीट इस्त्री करून आणून ठेवा!!'

आतून इतका राग येत होता आणि रडूपण येत होतं, एकतर भूक लागली होती आणि वरतून हे थर्ड डिग्री टॉर्चर सुरू होतं. पण आमचे फक्त हातच दगडाखाली नव्हते तर आम्ही पूर्णच एका खडकाखाली सापडलो होतो त्यामुळे त्यांनी सांगितलेल्या गोष्टी ऐकण्याशिवाय पर्याय नव्हता. मग काय, आत निघून गेलो, आवरलं आणि लगेच झोपायची तयारी केली. पोटभर बोलणे खाल्ल्यावर भूक तशीही मेलीच होती आणि काकूंनी सुध्दा जेवायला हाक मारली नाही.

विचार आला, आजची सकाळ किती छान उगवली होती, कुठेही असं वाटत नव्हतं की दिवसाचा शेवट असा निघेल! त्या दिवशी मला कळालं की ह्या जगात कितीही छोटी अथवा मोठी चूक असू देत त्याची शिक्षा तुम्हांला मिळतेच, यू कॅन नॉट एस्केप फ्रॉम इट!

सा.सू. - भाग ६

त्यानंतर घरात तणावपूर्ण शांतता नांदत होती, आम्ही सगळे नियम काटेकोरपणे पाळत होतो आणि काकू नेहमीप्रमाणे आम्ही कधी चुकतो आणि त्या कधी ओरडतात ह्याचा चान्स शोधत होत्या पण, आता आम्हांला हा टॉम-न-जेरीचा खेळ खेळायला वेळ आणि इंटरेस्ट नव्हता.कॉलेजमधे फायनल एक्झाम जवळ आली होती आणि आम्ही स्वत:ला अभ्यासात पूर्णपणे गाडून घेतलं होतं.

पण, जसा अभ्यास जोरात सुरू होता तसंच नवीन घराचा शोधही, आमची ५ महिन्यांची सक्तमजुरीची सजा संपत आली होती.आम्ही मित्र-मैत्रिणींना सांगून ठेवलं होतं आणि वेळात वेळ काढून पेईंग गेस्ट च्या जागा बघून येत होतो. ज्या दिवशी पहिली जागा बघितली त्या दिवशी संध्याकाळी घरी येतांना का काय माहित पण खूप धाकधूक वाटत होती, सारखं वाटत होतं की, काकूंना कळालं तर आपल्याला रागावतील. पण आश्चर्य म्हणजे माझी भिती खोटी ठरली आणि काकू काही बोलल्या नाहीत.

बऱ्याच जागा बघितल्यानंतर आम्ही एका आजींकडे जागा फायनल केली आणि अगदी बिनधास्त झालो. मग अभ्यासावर पूर्णपणे कॉन्सनट्रेट करायला लागलो. शेवटच्या दोन पेपर्सआधी रूमी म्हणाली की,' काकू को बताना होगा क्या हम लोग नेक्स्ट इयर नही आयेंगे वो?' मी म्हणाले, 'अरे, वैसे तो बतानेकी जरूरत नही है क्योंकी उन्होने ऑलरेडी हमे स्टार्टिंग मे कहा था, अगर कन्टिन्यू करना है तो नेक्स्ट इयर आके चेक करो अगर जगह खाली है तो फिर रहने के लिये आ जाना,सो आय डोन्ट थिंक वी हॅव टू टेल हर.' तिला ही ते पटलं.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे रात्री ८.३०ला आम्ही जेवायला बसलो आणि काकूंना भांडायची हुक्की आली. मी तर शांतपणे जेवायच ठरवलं होतं, कारण मला अजिबात आवडत नाही जेवतांना कोणी वाद घातलेला.

तर त्यांनी सुरू केलं, 'पुढच्या वर्षी मला नाही वाटत मी तुम्हांला ठेऊन घेईन ते. तुम्हांला अजिबात शिस्त नाहीये. मी आहे म्हणून तुम्हांला सांभाळून घेतलं. जर दुसरं कोणी असतं तर कधीच तुम्हांला जायला सांगितलं असतं.' बाsपरे! हे म्हणजे चोराच्या उलटया बोंबाच सुरू होत्या, *म्हणे मी सांभाळून घेतलं. उलट आम्ही कायम तुमचं ऐकलं, कधीही जास्त वाद घातला नाही, भांडण वाढवलं नाही आणि तुमच्याकडे पुढच्या वर्षी काय, अजुन एक मिनीटदेखील थांबायची इच्छा नाहीये इथे आमची!* माझं सगळं मौन स्वगत सुरू होतं.

कसंबसं जेवण आटोपलं आणि मी माझ्या खोलीत येऊन बसले. आजपर्यंत इतकं तिखट, चमचमीत जेवण मी कधीच जेवले नव्हते, छातीत एकदम जळजळ व्हायला लागली आणि मी शेवटी रडायला सुरूवात केली, आज १० महिने मी ह्या जेलमधे काढले पण कधी डोळ्यात पाणी नाही येऊ दिलं. पण आज माझा पेशन्स संपला होता. मग मी ठरवलं काहीही झालं तरी मी उद्या सकाळीच ह्या घरातून बाहेर पडणार,काहीही झालं तरी!

रात्री सगळा अभ्यास पूर्ण करून मी लगेच माझ्या बॅग्स भरायला सुरूवात केली तशी माझी रूमी एकदम चमकलीच, मी तिला सांगितलं की मी उद्या

पेपर झाल्यावर लगेच जाणार आहे. तिला काही कळेना काय करावं ते, कारण तिची ट्रेन परवा पहाटे होती. मग आम्ही प्लॅन केला की दुसऱ्या मैत्रिणीच्या फ्लॅटवर सामान उद्याच नेऊन टाकायचं, रूमी तिच्याकडेच राहणार आणि मी घरी जाणार. त्यानंतर दोघींनी भराभर पॅकिंग कम्प्लीट केलं, काकूंचं कपाट अगदी स्वच्छ करून ठेवलं आणि झोपलो, अगदी खुश होऊन, येस्स आजची ही शेवटची रात्र ह्या जेलमधली :-) :-)

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठुन दोघींनीपण आवरून सामान घेऊन बाहेर पडायचं ठरवलं होतं. पण अचानक काकूंनी आवाज दिला,मला पुन्हा एकदा भिती वाटली, पुन्हा एकदा काकू वाद घालणार, काल त्यांचं पोट भरलं नव्हतं बहुतेक! थोडं वैतागतच आम्ही किचनमधे गेलो. तिथे काकू अगदी शांतपणे उभ्या होत्या, त्यांच्या चेहऱ्यावर भांडण करण्याचे हावभाव अजिबात नव्हते,मला काही कळेना.

त्यांनी बोलायला सुरूवात केली, 'काल माझं चुकलचं गं पोरींनो, मी उगाच खुप बोलले तुम्हांला दोघींना. आय ॲम सॉरी गं, तुम्ही इथे राहू शकता, माझी काही हरकत नाहीये!'.

मी एकदम चक्रावूनच गेले, ये क्या हो रहा था? अचानक रात्रीतून काकूंना कोणत्या देवाने बुद्धी दिली आणि हा चमत्कार झाला?? काकू चक्क आम्हांला सॉरी



म्हणत आहेत? काहीतरी काळंबेरं आहे ह्यामधे नक्कीच. माझ्या लगेच लक्षात आलं की, जर आम्ही दोघी निघून गेलो तर त्यांचं चांगलच नुकसान होणार आहे आणि आम्ही कानाखालच्या होतो म्हणून निभावून नेलं पण दुसरं कोणी आलं तर त्यांचं काही ऐकुन घेणार नाही, हां हेच कारण असणार म्हणूनच आज इतके गोड शब्द ह्या कारल्याच्या तोंडून निघत आहेत. पण, मी माझ्या निर्णयावर ठाम होते, काहिही झालं तरी मी ह्यापुढे इथे राहणं शक्यच नव्हतं.

मी मग काकूंना सांगणार तेवढयात रूमी म्हणाली,'काकू, आप सॉरी मत कहिये प्लीज. हमारी मजबूरी है, हम यहां पे नही रेह सकते नेक्स्ट इयर.' मी मनामधे एकदम मिठीच घातली माझ्या रूमीला. आणि लगेच तिचं वाक्य पुढे कन्टिन्यू केलं, 'काकू आम्हांला दोघींना पुढच्या वर्षीपासून कम्प्युटर लागणारच आहे. आपल्या रूममधे दोघींचे कम्प्युटर्स मावणार नाहीत. आणि लाईटबिल पण खूप येइल. तेंव्हा आम्ही इथे काही परत येणार नाही' आणि मी तिथुन माझ्या खोलीत आले. रूमी अजुन तिथेच उभी होती, काकू काहितरी बडबडत होत्या. पण, मी अजिबात लक्ष नाही दिलं आणि सामान उचलुन बाहेर गेले. रूमीला एकदाच आवाज दिला. ती पण लगेच सामान घेऊन धावत आली आणि आम्ही त्या घराच्या छोटयाशा गेटमधून कायमचं बाहेर पडलो!!

मला अजूनही अगदी व्यवस्थित आठवतय माझी छाती कित्ती धडधडत होती त्या दिवशी सामान घेऊन त्या गेटच्या बाहेर पडतांना, त्या लेनच्या बाहेर पडल्यानंतर मात्र इतकं रिलॅक्स फील झालं ना,अगदी स्वर्ग गाठल्यासारखं वाटलं मला.

पण, आज ह्या सगळ्या गोष्टींचा विचार केल्यावर वाटतं की, काकूंनी फोर्सफुली म्हणा पण आम्हांला त्यांच्या सूचनांमधून,नियमावलीतून एक शिस्त लावली ज्याचा मला अजुनही खुप फायदा होतो. काकू जे पण टेन्शनवाले प्रसंग आमच्यासमोर टाकत होत्या त्यातही आम्ही दोघी काहितरी चांगलं, आमच्यासाठी उपयोगी असं शोधायचो ज्यातून कुठेतरी लाईफ चा एक फंडा मला नव्याने कळाला,कांईड ऑफ स्ट्रेस मॅनेजमेंट ट्रेनिंग वी हॅड इन दोझ टेन मंथ्स. . .

आत्ता मी त्या परिस्थितीमधून बाहेर आले आहे म्हणून मला असे छान छान विचार सुचत आहेत

पण, खरं सांगू,

माझ्या नशिबात खऱ्या सासूचा छळ असेल-नसेल माहित नाही पण, सासूरवास काय असतो ह्याचा व्यवस्थित अनुभव मात्र मी त्या १० महिन्यांमधे घेतला.

ई साहित्य प्रतिष्ठान

बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

कसं वाटलं पुस्तक? आवडलं? खुप आवडलं? अगदी प्रचंड आवडलं? तुम्ही आम्हाला सांगितलं तरच आम्हाला कळेल ना! तुमच्या मनोरंजनासाठी एवढं पानंच्यापानं लिहिणाऱ्या त्या लेखिकेला, प्रियंका जोशींना, तुम्ही काही ना काही कळवलंच नाहीत तर त्या पुढचं पुस्तक तुम्हाला कसं देणार? एक ई मेल तर पाठवायची. किंवा एक फोन.

इंटरनेटमुळे कधी नाही इतकं जग जवळ आलं. अत्यंत कमी खर्चात ई पुस्तकं बनवता येऊ लागली आणि लाखो वाचकांपर्यंत वितरण करणं शक्य झालं. त्यामुळे नवनवीन लेखकांसाठी एक व्यासपीठ उभं झालं. आणि वाचकांना प्रतिक्रिया देणंही सोपं झालं.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत गाभवनाची कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. ही कडधान्यं जर मातीत रुजवली तर त्यातून मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा म्हणतात की या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते. पण हा दाणा आपण भाजीत घालून खाल्ला की मात्र संपून जातो.

मानवी प्रतिभाही अशीच असते. मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. कधी कधी त्यांना योग्यवेळी माती खत पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. खत-पाणी म्हणजे वाचकांच्या प्रतिक्रिया, पत्रं, मतं, शाबासकी, दाद.

दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना नवीन पुस्तकं मिळत नाहीत. प्रयोग परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि

वाचावीत ते कळत नाही. अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरित करायला सुरूवात केली.

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. चारशेहून अधिक नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. त्यातील अनेकजण आज यशस्वी लेखक होताना दिसत आहेत. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींचे एक सुंदर व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका “दुर्ग दुर्घट भारी” द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. “जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी” ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या, कॉमिक्स, गूढकथा, प्रवासवर्णनं, आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाख रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या

बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल. होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?

आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

www.esahity.com

www.ednyaneshwari.com

www.marathiriyasat.com